# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

**प्रथम खबर अहवाल**

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** चंदगड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0371 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/09/2023 02:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 28/09/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/09/2023
   **Time From (वेळेपासून):** 13:56 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/09/2023 **Time (वेळ):** 01:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/09/2023 02:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बेळगाव ते वेंगुर्ला जाणारे रो,शिरगाव फाटयाजवळ, ताचंदगड, जि, शिरगाव ,चंदगड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** राजेंद्र शंकर भिंगुर्डे
**(b) Father's Name (वडील चे नाव) :** शंकर भिंगुर्डे
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978
**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तेऊरवाडी,चंदगड,चंदगड,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तेऊरवाडी,चंदगड,चंदगड,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):** व्यावसायीक
**(j) Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती सुभद्रा लक्ष्मणराव कांबळे | | | 1. विठ्ठल पाट,क्रीवास मंगल कार्यालयाजवळ,हनुमाननग, बेळगावबेळगाव,गुन्हे अन्वेषण विभाग ,कर्नाटक,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 च्या चलणी नोटा एकूण 50 नोट | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 29/09/2023

मी राजेंद्र शंकर भिंगुर्डे, वय- 45 वर्षे, व्यवसाय- कंत्राटदार, रा. तेऊरवाडी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर. मो. नं. 9423707990.समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 28/09/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना फोन करून माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, पंचायत समीती चंदगड येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालय चंदगड यांचेमार्फत जलजीवन मिशन अंतर्गत नळपाणी पुरवठा योजनेचे काम सुरू आहे. सदर कामाचे हर्षवर्धन विठ्ठल व्हन्नाळकर रा.कोवाड,ता.चंदगड,जि.कोल्हापूर हे मुळ मक्तेदार (ठेकेदार) आहेत.सदर काम करणेकरीता व्हनाळकर यांनी मला पोट मक्तेदार (ठेकेदार) म्हणुन नेमले आहे.त्याबाबतचे आम्ही दोघात करारपत्र केले असुन सदर काम मी स्वतः पोट ठेकेदार म्हणून करीत असून हे काम अंदाजे एकुण 1,05,00000/- रू. (एक कोटी पाच लाख रूपये) इतक्या रक्कमेचे असून त्यापैकी मौजे घुल्लेवाडी, ता.चंदगड, जि.कोल्हापूर या गावअंतर्गत पाईप लाईन घालणेकरीता अंदाजे 11,51,000/- रूपये इतक्या रक्कमेचे काम केले होते सदर कामाचे बिल श्रीमती सुभद्रा कांबळे, पद. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालय,चंदगड यांनी मंजुर केले होते त्याकरीता दिनांक 15/09/2023 रोजी मला कार्यालयात बोलावुन घेवुन माझ्याकडे मजुर केलेल्या 11,51,000/- रूपये बिलाच्या तीन टक्के प्रमाणे अदाजे रक्कम 33,000/- रूपये इतकी मागणी केली. त्यानंतर मला दि.27/9/2023 रोजी फोन करून दि.28/9/2023 रोजी पैसे घेवुन येणेस कळविले होते तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी आज रोजी कांबळे मॅडम यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी त्यांचे स्टाफ व पंचासह आज रोजीच चंदगड येथे चंदगडला येत असल्याचे सांगुन मला तेथे येण्यास सांगितले.

आज दिनांक 28/09/2023 रोजी नाळे साहेब त्यांचे स्टाफ पंचासह चंदगड येथे आल्याचे सांगुन मला तेथे बोलवले. त्यावेळी मी तेथे जावुन त्यांना भेटुन माझी ओळख सांगुन त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. त्यावेळी साहेबांनी माझी दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून देवुन त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी तक्रार सांगितली. त्यानंतर नाळे साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालय, चंदगड येथील, उप अभियंता, श्रीमती सुभद्रा कांबळे यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना कांबळे मॅडम यांना भेटणेकरीता पाठविले. तेव्हा कांबळे मॅडमसोबत कामाबाबत बोलणे झाले त्यावेळी त्यांनी मला आणलेत काय ? असे विचारले त्यावळी मी त्यांना बिल थोड आहे... काहीतरी कमी करा... असे म्हणालो त्यावेळी त्यांनी मला व्हनाळकरला सांगितले आहे त्यान सांगितले नाही... असे म्हणाल्या त्यावेळी मी त्याना तिन टक्के ने सांगितल्याचे म्हणालो त्यावेळी पुन्हा मी त्यांना काही तरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी त्या म्हणाल्या कि मला सतरा ठिकाणी खर्च असतो... त्यावेळी मी काहीतरी अरजेस्ट करा असे म्हणालो असता मॅडम यांनी जावु दे असे म्हणाल्या त्यानंतर मी त्यांना दहा मिनीटांनी येतो असे सांगुन मी व पंच नं.01 तेथुन साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली.

त्यानंतर नाळेसाहेबांनी कांबळे मॅडम यांनी माझेकडे नेमकी किती लाच रक्कम मागणी केली आहे हे पडताळणी करणे करीता पुन्हा मला व पंच नं.01 यांना कांबळे मॅडम यांना भेटणेकरीता पाठविले. मी कांबळे यांना पुन्हा त्यांचे कार्यालयात भेटलो त्यावेळी मी त्यांना मॅडम रागऊ नका मुलगा संदिप हा पैसे घेवुन येत आहे. तीन टक्याने तेतीस हजार होतात आता फक्त पंचवीस हजाराची व्यवस्था झाली आहे असे म्हणालो त्यावेळी कांबळे मॅडम यांनी ठीक आहे म्हणाल्या त्यावेळी मी त्यांना एक पंचवीस हजार अॅडजेस्ट करा असे म्हणालो त्यावेळी कांबळे मॅडम यांनी ठीक आहे ठीक आहे असे म्हणुन त्यांनी मागणी केलेल्या 33,000/- रूपयामध्ये तडजोड करून

25,000/- रूपये मागणी केली त्यानंतर कामाचे अनुषंगाने आमच्यात बोलणे झाले. त्यानंतर मी त्यांना एक अर्ध्या तासात मुलगा पैसे घेवुन येत असल्याचे सांगितले त्यावेळी कांबळे मॅडम यांनी ठीक आहे असे म्हणाल्या. त्यानंतर मी व पंच नं.01 तेथुन साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना हकीकत सांगितली.

त्यानंतर नाळे साहेबांनी सापळा कारवाई सुरू केली सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अॅंथ्रासिन लावलेले 25,000/- रूपये माझे शर्टचे डावे खिशात ठेवुन रेकॉर्डर सुरु करून ते माझेकडे दिले त्याचवेळी कांबळे मॅडम यांचा मला फोन आला व त्यानी त्या कार्यालयातुन निघाल्या असुन मला शिरगाव फाटा येथे येण्यास सांगितले.त्यानंतर मी व पंच नं. 01 असे माझे गाडीतुन निघालो त्यावेळी माझे पाठोपाठ सापळा पथक आले.मी शिरगाव फाटा येथे आल्यानंतर मॅडम यांना फोन करून आपण कोठे आहे असे विचारले असता त्यांनी त्या शिरगावकडे जात असलेल्या फाटयाजवळ असल्याचे सांगितले तेवढयात मी कांबळे मॅडमची स्विफ्ट कार शिरगाव फाटा येथे दिसल्यानंतर मी त्यांचे गाडीचे पाठीमागे माझी गाडी थांबविली त्यावेळी माझे पाठापोठ आलेली सापळा पथकाची गाडी ही तेथे आली त्यातुन सापळा पथकातील सर्वजण आजुबाजुला रस्त्यालगत थांबले. मी मॅडम चे कारजवळ गेलो त्यावेळी कारमध्ये कांबळे मॅडम एकटयाच होत्या त्याचा कारचालक त्यावेळी कारमध्ये नव्हता. त्यावेळी मी कांबळे मॅडम यांना पैसे आणल्याचे सांगुन मोजुन घ्या पंचवीस हजार आहेत असे म्हणुन त्यांना त्यांनी मागणी केलेले पैसे दिले. त्यावेळी कांबळे मॅडम यांनी ते पैसे उजव्या हाताने घेवुन गाडीचे डॅश बोर्डमधील ड्रावर उघडुन त्यामध्ये पैसे ठेवले व राहु दे आता तुम्ही काय खोट सांगणार आहात काय असे म्हणाल्या त्यानंतर आमच्यात कामाचे अनुषंगाने बोलणे सुरु असताना मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच नाळे साहेब आणि त्यांचा स्टाफ तेथे आला त्यावेळी सापळा पथकातील पाटील मॅडम यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह कांबळे मॅडम यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही चंदगड पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली.

तरी मी मौजे घुल्लेवाडी, ता.चंदगड, जि.कोल्हापूर येथे केलेल्या गावातील पाईप लाईन कामाच्या बिलाची रक्कम 11,51,000/- रूपये मंजुर केली म्हणुन श्रीमती सुभद्रा लक्ष्मणराव कांबळे, उप अभियंता, वर्ग -1, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,उपविभाग क्र.9 चंदगड, ता.चंदगड, जि.कोल्हापूर यांनी माझेकडे मंजुर बिलाचे तीन टक्के प्रमाणे रक्कम 33,000/- रूपये अप्रामाणिकपणे मागणी करून माझ्याकडुन त्यांनी बेकायदेशीरपणे तडजोडीअंती 25,000/- रूपये लाच स्विकारताना त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने त्यांना रंगेहाथ पकडल्याने माझी श्रीमती सुभद्रा लक्ष्मणराव कांबळे, उप अभियंता, वर्ग -1, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,उपविभाग क्र.9 चंदगड, ता.चंदगड, जि.कोल्हापूर सद्या रा.बेळगाव, हनुमाननगर, भक्तीवास मंगल कार्यालयाजवळ, श्री विठ्ठल पाटील यांचे घरी भाडयाने बेळगाव, जि.बेळगाव, राज्य कर्नाटक, मुळ रा.सी - 506, साकेत पॅराडाईज आधारवाडी जेल रोड, कल्याण पश्चिम, जि.ठाणे यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANTOSH SHRIMANT GHOLAVE(I (Inspector)) / 11301000362SSGM7401C

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or (किंवा)**

**Rank (पद):**

**No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANTOSH SHRIMAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 11301000362SSGM740